| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **CNR No.MHKO200003572018** | दाखल तारीख | – | ०४ | १२ | २०१८ |
| | नोंदणी तारीख | – | ०४ | १२ | २०१८ |
| | निकाल तारीख | – | १४ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | ०७ | ०५ | १० |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**
**यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक ४१/२०१८.**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक 80/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– १४ मे २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.२९/२०१८ भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत कळे पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | १. | आनंदा लखू कुंभार, व.व.७९ |
| | २. | शालाबाई आनंदा कुंभार, व.व.६७ |
| | ३. | जोतीराम आनंदा कुंभार, व.व.४०, |
| | ४. | कांचन जोतीराम कुंभार, व.व.३९, |
| | | आरोपी क्रं.१ ते ४ रा. वाळवेकरवाडी,<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| | ५. | श्रीकांत मारुती कुंभार, व.व.४१, |
| | | रा. वाकरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर |
| | ६. | अक्षय युवराज पांडव, व.व.३०, |
| | | रा. खुपीरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर, |
| | ७. | आदित्य युवराज पांडव, व.व.२८, |

| | | |
|---|---|---|
| | | रा.खुपीरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर. |
| आरोपीतर्फे वकील | | ॲड. श्री. व्ही.एस. पाटील |

## **<u>भाग–ब</u>**
## **(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ३०.०४.२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०४.०५.२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०४.१२.२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | ११.११.२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १४.०८.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १४.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## **आरोपीची माहिती**

<table>
<tr><th>आरोपी क्रं.</th><th>आरोपीचे नांव</th><th>अटक दिनांक</th><th>जामिनावर सोडल्या चा दिनांक</th><th>गुन्हयाचे कलम</th><th>अंतिम आदेश</th><th>शिक्षा</th><th>फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी</th></tr>
<tr><td>१.</td><td>आनंदा लखू कुंभार,</td><td rowspan="5">फौ.प्र.सं. कलम ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस</td><td>०४.१२. २०१८</td><td rowspan="5">भा.द.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>२.</td><td>शालाबाई आनंदा कुंभार,</td><td>०४.१२. २०१८</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>३.</td><td>जोतीराम आनंदा कुंभार,</td><td>०४.१२. २०१८</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>४.</td><td>कांचन जोतीराम कुंभार,</td><td>०४.१२. २०१८</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
<tr><td>५.</td><td>श्रीकांत मारुती</td><td>०४.१२. २०१८</td><td>निर्दोष मुक्तता</td><td>–</td><td>–</td></tr>
</table>

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कुंभार, | | | | | | |
| ६. | अक्षय युवराज पांडव, | | ०४.१२. २०१८ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ७. | आदित्य युवराज पांडव, | | ०४.१२. २०१८ | | निर्दोष मुक्तता | – | – |

## <u>भाग–क</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | वंदना बापू कुंभार | जखमी साक्षीदार | ५६ |
| २. | शारदा अनिल कुंभार | साक्षीदार | ५९ |
| ३. | मारुती दादू कुंभार | जखमी साक्षीदार | ६० |
| ४. | हिंदूराव सदू कुंभार | जखमी साक्षीदार | ६७ |
| ५. | प्रकाश बापू वाळवेकर | जखमी साक्षीदार | ६८ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| –– | निरंक | –– |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| -- | निरंक | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | २५ | दोषारोप |
| ३. | २६ ते ३२ | आरोपींचे निवेदन |
| ४. | ७३ ते ७८ | आरोपी क्रं.१ ते ६ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब |

**ड. भौतिक वस्तु**

| अ.क्रं. | मुद्देमाल अर्टीकल नं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | संयुक्तीक आर्टीकल अ | एक चिव्याची काठी,४२ इंच लांबीची जुनी वापरती |
| २. | | एक चिव्याची काठी, ५६ इंच लांबीची जुनी वापरती |
| ३. | | एक चिव्याची काठी, ३२ इंच लांबीची जुनी वापरती |
| ४. | | एक चिव्याची काठी, ३३ इंच लांबीची जुनी वापरती |
| ५. | | एक चिव्याची काठी, ३९ इंच लांबीची जुनी वापरती |
| ६. | | एक चिव्याची काठी, ३२ इंच लांबीची जुनी वापरती |
| ७. | | एक चिव्याची काठी, ४० इंचलांबीची जुनी वापरती |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक १४ मे २०२६ रोजी घोषित)

आरोपी क्रं.१ ते ७ यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८,३२५,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी व आरोपी नं.१

ते ४ हे नात्याने भाऊबंद असुन आरोपी नं.५ हा आरोपी नं.३ चा मेव्हणा असुन आरोपी नं.६ व ७ हे आरोपी नं.५ चे मित्र आहेत. दि.३०/०४/२०१८ रोजी १६.०० वाजताचे सुमारास वाळवेकरवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर हद्दीतील फिर्यादी यांचे जमीन गट नं.२८९ मध्ये सर्व आरोपी जमुन संगनमताने साक्षीदार मारुती सदू कुंभार यांचे मालकीचे जमीन गट नं.२८९ मधील जनावरांचे पत्र्याचे शेड बेकायदेशीरपणे पाडत असताना फिर्यादी व इतर साक्षीदार हे त्यांना विचारणा करीत असताना आरोपींनी चिडून सर्व आरोपींनी मारुतीला काठीने मारलेमुळे तो खाली पडला व त्याच्या डोक्यातून रक्त येऊ लागले. त्यावेळी फिर्यादी बापू सदू कुंभार व त्याची पत्नी आरोपींना आडवत असताना आनंदा कुंभार याने काठीने फिर्यादीला व वंदनाला काठीने डोक्यात मारले. हा सर्व दंगा ऐकुन फिर्यादीची चुलत बहीण शारदा कुंभार व फिर्यादीचा चुलत पुतण्या अरविंद हे दोघे तेथे आले त्यावेळी शालाबाई व तिची सुन कांचन यांनी शारदाच्या पायावर व हातावर काठीने मारले तर श्रीकांत कुंभार याचा खुपिरे गावचा मित्र अक्षय पांडव याने काठीने मारले. त्यावेळी फिर्यादीची पत्नी उठून फिर्यादीजवळ येत असताना श्रीकांत कुंभार याने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीची पत्नी वंदना हिच्या डोक्यात मारले. त्यावेळी फिर्यादीचा शेजारी राहणारा भाऊ हिंदुराव कुंभार हा सोडवासोडव करीत असताना त्यालाही सर्व आरोपींनी तू पुढं यायचं नाहीस आलास तर पाय मोडतो असे म्हणुन पायावर काठीने मारले. हा सर्व प्रकार घडत असताना गावचे तंटामुक्त अध्यक्ष प्रकाश वाळवेकर हे तेथे आले तेव्हा वरील सर्व लोकांनी तंटामुक्त अध्यक्षांनाही काठीने मारलेने त्यांच्या डोक्याला, हाताला, पाठीत व डाव्या पायाला मार लागला तसेच डावा पाय फ्रॅक्चर झाला. सर्व आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना वाईट शिव्या दिल्या तसेच धमकी दिली. त्यानंतर जखमींना कळे येथील सरकारी दवाखान्यात उपचारास आणले, परंतु सर्वांच्या जखमेतून जास्तच रक्त येत असलेने त्यांना तात्काळ १०८ ॲम्ब्युलन्सने सी.पी.आर. येथे ॲडमीट केले.

**०३.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द कळे पोलीस ठाणे गु.र.क्र.२९/२०१८ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८, ३२५,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला.सदर गुन्हयाचा तपास पोलीस नाईक जी.डी. गुरव यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा नोंदवला, हत्यार जप्तीचा पंचनामा केला, मुद्देमाल पोलीस ठाणेत जमा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जखमींची वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०४.** माझे पूर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.२५ नुसार भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,१४८,३२५,३२४,५०४,५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.२६ ते ३२ वर नोंदविण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एकुण पाच साक्षीदारांचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. पुरेशी संधी दिलेनंतर तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन नि.क्र.१ कडील दि.१५/०३/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. तद्नंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.७३ ते ७८ कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद

ऐकला.

**०६.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.३०/०४/२०१८ रोजी १६.०० वाजताचे सुमारास वाळवेकरवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर हद्दीतील तांबोळी नांवाच्या शेतामध्ये आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा की ज्याचा सामाईक उद्देश फिर्यादी बापु कुंभार व साक्षीदार यांना मारहाण किंवा हल्ला करणेचा उद्देश असलेल्या जमावाचा घटक होते व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा करुन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन मारहाण केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी गुन्हयात वापरलेस मृत्यू होईल अशा प्राणघातक काठीने सज्ज होऊन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा केला व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४८ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी हत्यार म्हणुन वापरलेस मृत्यू होईल अशा काठीने फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी साक्षीदार प्रकाश यांना काठीने मारहाण करुन त्याचे डोक्याला व डाव्या पायाला ईच्छापूर्वक जबर दुखापत पोहोचवली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ३२५ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ६. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ७. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारणेची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ८. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोषमुक्त करणेत येते. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ७ करीताः</u>**

**०७.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ७ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०८.** प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.१ वंदना बापू कुंभार **(जखमी साक्षीदा/नि.क्र.५६)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, फिर्यादी बापू कुंभार हे त्यांचे पती आहेत. त्या आरोपी क्र.१ ते ७ यांना ओळखतात. न्यायालयात आरोपी क्र.१ ते ४ हजर आहेत. आरोपीं पैकी आरोपी क्र.१ हा त्यांना नात्याने दीर लागतो. आरोपी क्र.६ व ७ हे खुपीरे गावचे राहणारे आहेत. घटना ६ वर्षापुर्वी दुपारी ४ च्या सुमारास वाळवेकरवाडी गावच्या हद्दीत तांबोळी शेतात घडली होती. मारुती कुंभार हे त्यांचे दिर असुन मारुती कुंभार यांनी तांबोळीच्या शेतात पत्र्याचे शेड घातले आहे. शालाबाई कुंभार, आनंदा कुंभार, जोतीराम कुंभार, कांचन, शालाबाई, श्रीकांत व आरोपी क्र.६ व ७ हे सदरचे शेड पाडू लागले. त्यावेळी त्या शेतात चालल्या होत्या. आरोपी क्र.१ ने वर नमुद लोकांना शिवीगाळ केली. सदरचे शेड मारुती कुंभारचे असल्याने आरोपी क्र.१ ते ७ ते मोडू लागल्याने त्यांच्यात शिवीगाळ व मारहाण झाली. मारहाण झाल्यानंतर त्या घटनास्थळावर पोहोचल्या त्यावेळी मारुती कुंभारच्या डोक्यातुन रक्त वाहत होते.

त्यांच्या पतीला आनंदा कुंभार याने मारले त्यांचे पती भांडण सोडवण्यासाठी गेले होते. थोडया वेळाने त्या तिथे पोहोचल्या. त्यांच्या पतीला मारहाण झालेली बघुन त्यांनी त्यांना बाजुला घेत असताना खुपीरेच्या पाहुण्यांनी तिला डोक्याला काठीने पाठीमागुन मारहाण केली. खुपीरेच्या ज्या पाहुण्यांनी मारहाण केली त्याचे नाव तिला माहिती नाही. परंतु पाहिल्यावर ती त्यांना ओळखू शकते. मारुती कुंभार, बापू कुंभार व तिला काठीने मारहाण झाली. सदर साक्षीदाराच्या बाजुकडील काही लोक त्या ठिकाणी सोडवासोडव करायला आले होते. त्या लोकांची नावे तिला सांगता येणार नाहीत. त्यानंतर त्यांना प्राथमिक उपचाराकरीता, प्राथमिक आरोग्य केंद्र, कळे येथे नेणेत आले त्यानंतर सी.पी.आर. हॉस्पीटल कोल्हापूर या ठिकाणी नेणेत आले. ज्या काठयांनी त्यांना मारहाण झाली त्या काठया (संयुक्तीकरित्या आर्टीकल अ) तिला दाखवण्यात आल्या त्या त्याच आहेत. घटनेबाबत तिच्या पतीने तक्रार दिलेली होती.

०९. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ शारदा अनिल कुंभार **(साक्षीदार/नि.क्र.५९)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, आनंदा कुंभार हे तिचे चुलत भाऊ आहेत म्हणुन ती त्यांना ओळखते. शालाबाई कुंभार ही तिची चुलत भावजये आहे. जोतीराम कुंभार हा तिचा भाचा असून कांचन जोतीराम कुंभार ही तिची भाची सुन आहे. श्रीकांत सुतार, अक्षय पांडव व अदीत्य पांडव हे कोणत्या गावचे आहे हे माहित नाही व ती त्यांना ओळखत नाही. दि.३०/०४/२०१८ रोजी मारुती कुंभार व आनंदा कुंभार यांच्यात भांडणे लागली होती. त्यांच्यात कोणत्या कारणावरुन भांडणे लागली होती हे तिला माहित नाही. घटना दुपारी ४ चे सुमारास घडली होती. साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी तिला उलटतपसामध्ये विचारतात तसे प्रश्न विचारुन देखील आरोपींविरुचा गुन्हा सिध्द होईल असा सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ मारुती दादू कुंभार **(जखमी**

**साक्षीदार/नि.क्र.६०)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, ते आरोपींना ओळखतात. आनंदा कुंभार हे त्यांचे भाऊ आहेत. शालाबाई कुंभार ही त्याची पुतण सुन आहे. वाकरेचे श्रीकांत यांचे आडनाव कुंभार आहे. न्यायालयात आनंदा कुंभार, शालाबाई कुंभार, कांचन कुंभार हे हजर आहेत. इतर आरोपींना त्याने पाहिले असता ते ओळखू शकणार नाही. त्यांची जमीन कुठे आहे तिचा गट नंबर काय आहे तिचे पडनाव काय हे त्याला माहिती नाही. त्यांच्या जनावरांचे शेड ज्या जागेवर बांधले होते त्या जागेचे नाव त्याला सध्या आठवत नाही. सर्व आरोपींनी त्याला व त्याचे कुटुंबिय तसेच प्रकाश वाळवेकर तंटा मुक्ती अध्यक्ष वाळवेकरवाडी यांना काठीने मारहाण केलेचे तो सांगू शकत नाही कारण त्याला त्यावेळी चक्कर आली होती. साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी तिला उलटतपासामध्ये विचारतात तसे प्रश्न विचारुन देखील आरोपींविरुचा गुन्हा सिध्द होईल असा सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

११. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ हिंदूराव सदू कुंभार **(जखमी साक्षीदार/नि.क्र.६७)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, ते सर्व आरोपींना ओळखतात कारण ते त्यांचे नातेवाईक आहेत. आरोपी क्र.६ व ७ हे देखील त्याचे पाहुणे आहेत. फिर्यादी बापु कुंभार यांना ओळखतात कारण ते त्याचे भाऊ आहेत. दि.३०/०४/२०१८ रोजी दुपारी ४ चे सुमारास त्यांच्या शेतात असलेल्या घराशेजारी आरोपी व फिर्यादी यांची भांडणे झाली. सर्व आरोपींनी बापू कुंभार, त्यांची बहीण शारदा कुंभार यांना काठीने मारले. त्या दोघांनाही आरोपीने काठीने मारहाण केली. फिर्यादी व आरोपी यांच्या मध्ये शेताच्या कारणावरुन मारहाण झाली. ते प्रकाश वाळवेकर यांना ओळखतात. कारण ते त्यांच्या गावचे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष आहेत. आरोपींनी प्रकाश वाळवेकर यांना काठीने डोक्यात व दोन्ही पायावर मारहाण केली सदर मारहाणीत त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला होता. आरोपींनी त्याला, बापू कुंभार,

शारदा कुंभार, प्रकाश वाळवेकर यांना काठीने मारहाण केली. त्या ठिकाणी त्याची पत्नी कल्पना कुंभार हजर होती. ज्या काठीने त्याला मारहाण झाली त्या दाखवलेस ते ओळखू शकतात. त्या आर्टीकल अ वर दाखल आहेत. त्या त्या नाहीत असे कथन केले. आरोपींपैकी आरोपी क्र.१, २, ४ हजर आहेत. इतर आरोपीना पाहीले असता ते ओळखू शकतात. आर्टीकल अ वर दाखल असलेल्या काठया तथाकथीत घटनेमध्ये वापरल्या नाहीत.

१२. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ प्रकाश बापू वाळवेकर **(जखमी साक्षीदार/नि.क्र.६८)** यांचे मौखीक पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि. ३०/०४/२०१८ रोजी ते वाळवेकरवाडी या गावच्या तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष होते. ते सर्व आरोपींना ओळखतात कारण आरोपी क्र.१ ते ४ त्यांच्या गावातील आहेत व आरोपी क्र.५ ते ७ हे आरोपी क्र.१ ते ४ यांचे पाहुणे आहेत. ते मारुती कुंभार, बापु कुंभार व हिंदुराव कुंभार यांना ओळखतात त्या दिवशी फिर्यादी व आरोपींच्यात भांडणे चालु होती. सदरची भांडणे त्यांनी पाहिलेली आहेत त्या दिवशी ते वाळवेकरवाडी येथुन कळे येथे येत होते. त्यांच्या रस्त्यालगत तांबोळकी नावाचे शेत आहे सदर शेतात हिंदुराव कुंभार राहत असुन त्या ठिकाणी त्यांचे घर व शेड आहे सदर शेताचा गट नं. २७९ आहे. त्यादिवशी आरोपी क्र.१ व त्यांचे पाहुणे यांनी मारुती कुंभार यांना काठी व रॉडने मारहाण केली त्यावेळी त्यांनी पाहिले. ते सोडवायला गेले असता आरोपी क्र.५ ते ७ व ३ यांनी त्यांना काठीने डाव्या पायावर व डोक्यावर मारहाण केली. त्यामुळे त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला होता. त्यांच्या समक्ष बापु कुंभार यांच्या पत्नीला देखिल मारहाण झाली होती. सदरची मारहाण महिला आरोपीने काठीने केली होती. फिर्यादी व आरोपींच्यात शेताचे कारणावरुन भांडणे झाली होती. घटनेनंतर त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र कळे येथे उपचार घेतले. त्यानंतर सी. पी. आर हॉस्पीटल कोल्हापूर येथे त्यांना, बापू कुंभार व आनंदा कुंभार यांना डॉक्टरांनी पुढील उपचाराकरीता पाठवले.

त्यांनी आर्टीकल अ वर असणा–या काठया त्या त्या नाहीत असे सांगितले आहे. आरोपी नं.१, २, ४ हजर आहेत इतर आरोपींना पाहिले असता ते ओळखू शकतात.

**१३.** अशा प्रकारे उपरोक्त प्रमाणे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा सरतपास पटलावर आला असताना सदर साक्षीदारांच्या एकूणच मौखिक पुराव्याचे मूल्यमापन करण्याकरीता त्यांचा सरतपास हा उलटतपासामध्ये देखील अबाधित राहिला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे साक्षीदारांचा उलटतपास पुढीलप्रमाणे –

**१४.** साक्षीदार क्र.१ वंदना बापू कुंभार **(जखमी साक्षीदार/नि.क्र.५६)** सदर साक्षीदार ही फिर्यादीची पत्नी असुन त्यांनी त्यांचे आरोपीतर्फे नोंदवलेल्या उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, शारदा, संपदा व मंगल या तिच्या चुलत नणंदा असुन त्या त्यांच्या सासरी नांदत आहेत. सन २०१८ साली त्या त्यांचे पती व दोन मुले असे राहत होते. सन २०१८ साली त्यांची मुले सज्ञान हाती पण लग्न झाली नव्हती. त्यांच्यात व आरोपींमध्ये वडिलोपार्जित मिळकतीचे अद्याप वाटप झालेले नाही. तांबोळी शेताच्या दक्षिण बाजुस वाळवेकरवाडी या गावात जाणारा रस्ता आहे. सदर तांबोळीच्या शेतात आरोपी क्रं.१ आनंदा कुंभार यांची देखील वहिवाट आहे. सदरची वहिवाट ही लखु कुंभार यांनी जागा खरेदी केल्यापासुन सदर आरोपींची त्या क्षेत्रात वहिवाट आहे. पुर्वी त्यांचे दीर मारुती कुंभार यांची सदर जमीनीवर वहिवाट नव्हती. त्यांचे पती बापू व त्यांचे दीर मारुती व हिंदुराव यांचे गट नं.२८९ मध्ये देखील क्षेत्र असुन सदर क्षेत्र फिर्यादीच्या घरच्यांचे आहे अशी त्यांची आरोपींकडे मागणी होती. सदर बाबीवर आरोपी क्र.१ ने सदरची जागा सदर साक्षीदाराच्या वडीलांनी खरेदी केली असल्याने केवळ त्यांचा हक्क आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या चुलत नणंदा शारदा, संपदा व मंगल यांचे गट नं.२८९ मध्ये कधीही वहिवाट नव्हती. मारुती यांना शेड मारण्या कामी त्यांचे पती बापू कुंभार व दिर हिंदुराव कुंभार यांनी देखील मदत केली होती. सदर शेड बांधकामाच्यावेळी मारुती कुंभार, अरविंद कुंभार, त्यांचे पती

बापु कुंभार, शारदा कुंभार, हिंदुराव कुंभार, जयवंत कुंभार, अक्षय कुंभार, कल्पना कुंभार, अनिल कुंभार, प्रकाश वाळवेकर अशा लोकांनी मदत केली होती. शेड मारताना त्या प्रत्यक्ष हजर नव्हत्या. गट नं.२८९ मध्ये नेमके कोणत्या ठिकाणी शेड मारण्याचा प्रयत्न केला गेला हे त्यांना माहिती नाही. सदर मारहाणीत आनंदा कुंभार हे जखमी झाल्याने त्यांनी गु.र.नं.३०/२०१८ अन्वये वर नमुद आकरा लोकांविरुध्द गुन्हा दाखल केला. मारुती कुंभार, बापू कुंभार यांना कशाने जखम झाली, कोणी जखम केली तसेच प्रत्यक्ष घटना घडते वेळी त्या स्वत: हजर नव्हत्या. त्यांच्यात व आरोपींमध्ये गट नं.२८९ तांबोळी नांवाच्या शेतावरुन दिवाणी स्वरुपाचा वाद सुरु असुन तो न्यायप्रविष्ठ आहे. त्यांचेत व आरोपींमध्ये असलेल्या दिवाणी वादावरुन त्यांचे मनात आरोपींविरुध्द राग असल्याने त्यांनी देखील आरोपींविरुध्द केस दाखल केली आहे. त्यांचा मुलगा महेश कुंभार यांनी आरोपी क्रं.१ आनंदा कुंभार यांचे विरुध्द प्रस्तुत न्यायालयात रे.क.नं.२४/२०२५ हा दावा दाखल केला आहे. गट नं.२८९ मधील क्षेत्र त्यांना देखील मिळावे अशी त्यांची अभिलाषा आहे.

**१५.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ शारदा अनिल कुंभार **(साक्षीदार/नि.क्र.५९)** यांचे उलटतपसामध्ये असे आले आहे की, बापु कुंभार हे त्यांना नात्याने चुलत भाऊ लागतात. त्यांनी किती तारखेला दंगा ऐकला हे त्यांना सांगता आले नाही. त्यांनी प्रत्यक्ष बापु कुंभार, वंदना कुंभार, अरविंद कुंभार, प्रकाश वाळवेकर यांना मारहाण केल्याचे पाहिलेले नाही. प्रकश वाळवेकर यांच्या पायाला कशामुळे दुखापत झाली हे त्यांना माहिती नाही. त्यांना वैयक्तीक मारहाण व दुखापत झालेली नाही. त्यांची वैयक्तिक आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्या साक्ष देणे कामी प्रकाश वाळवेकर यांच्या सोबत न्यायालयात आल्या आहेत.

**१६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.४ हिंदुराव सदू कुंभार **(जखमी साक्षीदार/नि.क्र.६७)** यांचे उलटतपसामध्ये असे आले आहे की, तंटामुक्ती समितीचे

अध्यक्ष प्रकाश वाळवेकर यांनी त्यांच्यातील व आरोपींमधील असलेला शेतीचा वाद दोन वेळा मिटवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या भावंडांमध्ये त्यांच्यातील मिळकतीचे तोंडी किंवा लिखीत स्वरुपात वाटप झालेले नाही. लखु कुंभार हे आरोपी क्रं.१ आनंदा कुंभार यांचे वडील आहेत. सदर शेडच्या दक्षिण बाजुस वाळवेकरवाडी या गावाकडे जाणारा रस्ता आहे. आजरोजी तांबोळी नांवाचे शेत आरोपी क्रं.१ च्या नांवावर आहे. तथाकथीत घटने दिवशी आरोपींनी जबरदस्ती करुन शेड पाडण्याचा प्रयत्न केला आहे. घटनेच्यावेळी सदर साक्षीदार घरात विश्रांती घेत होता. आजदेखील तांबोळकी नावाच्या शेतामधील काही क्षेत्र त्यांना मिळावे अशी त्यांची इच्छा आहे. आनंदा कुंभार हे सदर शेतातील काहीही क्षेत्र देण्यास तयार नाहीत त्यामुळे आरोपीविषयी त्यांच्या मनात राग आहे. सदर रागाची उत्पत्ती म्हणुन प्रस्तुतची फिर्याद दाखल केलेली आहे. त्यांनी स्वत: आरोपींविरुध्द फिर्याद दिलेली नाही.

**१७.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५ प्रकाश बापु वाळवेकर **(जखमी साक्षीदार/नि.क्र.६८)** यांचे उलटतपासामध्ये असे आले आहे की, सदर न्यायालयात त्यांनी दिलेली व त्यांच्याविरुध्दची प्रकरणे दाखल असुन ती दिवाणी व फौजदारी अशा वर्गातील आहेत व ती न्यायप्रविष्ठ आहेत. फिर्यादी किंवा आरोपीकडे लोक स्वत:हुन त्यांना बोलवायला आले नव्हते. फिर्यादीने आरोपीविरुध्द व आरोपीने फिर्यादीविरुध्द केलेली प्रकरणे ती आपसात तडजोड करण्यास तयार आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र कळे येथे उपचार घेवुन सी.पी.आर. हॉस्पीटलला गेले.

**१८.** एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये पुर्वीपासुन गट नं.२८९ बाबत वाद असुन त्याचा दिवाणी दावा न्यायप्रविष्ठ आहे. साक्षीदार क्रं.१ वंदना बापु कुंभार यांचे उलटतपासामध्ये असे आले आहे की, गट नं.२८९ मध्ये कोणत्या ठिकाणी शेड मारण्याचा प्रयत्न केला हे त्यांना माहित नाही.

मारुती कुंभार व बापु कुंभार यांना कशाने जखम झाली या विषयी त्यांनी काहीही सांगितलेले नाही. त्यांचा मुलगा महेश कुंभार याने आरोपी क्र.१ आनंदा कुंभार यांचे विरुध्द प्रस्तुत न्यायालयात रे.क.नं.२४/२०२५ चा दावा दाखल केला असुन गट नं.२८९ मधील क्षेत्र त्यांना देखील मिळावे अशी त्यांची अभिलाषा आहे. सदर साक्षीदाराने प्रत्यक्षदर्शी घटना पाहिलेली नाही व केवळ ऐकीव माहितीच्या आधारे साक्ष नोंदवलेली आहे.

**१९.** साक्षीदार क्र.२ शारदा अनिल कुंभार यांचे उलटतपासामध्ये असे कबुल केले आहे की, त्यांना वैयक्तीक मारहाण व दुखापत झाली नसुन कळे पोलीसांनी त्यांच्याकडे येवुन त्यांचा जबाब नोंदवुन घेतला नाही किंवा त्यांनी पोलीसांच्याकडे जावुन जबाब देवुन सही केलेली नाही. त्यांची आरोपींविरुध्द वैयक्तिक तक्रार नाही. साक्षीदार क्र.३ मारुती दादू कुंभार यांनी अभियोगपक्षस सहाय्य केले नसल्यामुळे त्यांची साक्ष अभियोगपक्षाकरिता निरुपयोगी ठरलेली आहे. साक्षीदार क्रं.४ हिंदुराव सदू कुंभार यांचे उलटतपासामध्ये असे आले आहे की, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रकाश वाळवेकर यांनी त्यांच्यातील व आरोपींमधील असलेल्या शेतीचा वाद दोन ते तीन वेळा मिटवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यात व आरोपींमध्ये शेत मिळकतीचे तोंडी अथवा लिखीत स्वरुपात वाटप झालेले नाही. आजरोजी तांबोळी नांवाचे शेत आरोपी क्र.१ च्या नावावर आहे. घटनेच्यावेळी ते त्यांचे घरी असल्याने प्रत्यक्ष घटना त्यांनी पाहिलेली नाही.

**२०.** साक्षीदार क्र.५ प्रकाश बापु वाळवेकर यांचे उलटतपसामध्ये असे आले आहे की, फिर्यादीने आरोपींविरुध्द व आरोपींनी फिर्यादीविरुध्द दाखल केलेली प्रकरणे ते आपसात तडजोड करण्यास तयार आहेत. अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी बापू सदू कुंभार, पंच संजय वाळवेकर, आनंदा वाळवेकर, तसेच तपासी अंमलदार जी.डी. गुरव यांना अभियोपगपक्षाच्या वतीने वारंवार साक्षीसमन्स

पाठवून देखील सदर साक्षीदार न्यायालयात हजर राहिले नाहीत. अभियोगपक्षाने अरविंद मारुती कुंभार रा. वाळवेकरवाडी यांचे जखमी प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले असले तरी त्याची पृष्ठी केली नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही. अभियोगपक्षाने कायद्याप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमुळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी काठया घेवुन दंगल केली व फिर्यादी व साक्षीदार यांना काठीने मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचवली, तसेच शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र गुन्हा केल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ७ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्र.८ करीताः</u>**

**२१.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ७ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे आरोपींवर असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एकुण सात चिव्याच्या काठया हया आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्नबिंदू क्र.८ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.१. आनंदा लखू कुंभार, आरोपी क्रं.२ शालाबाई आनंदा कुंभार, आरोपी क्र.३ जोतीराम आनंदा कुंभार, आरोपी क्रं.४ कांचन जोतीराम कुंभार, आरोपी क्रं.१ ते ४ रा. वाळवेकरवाडी, ता. पन्हाळा,

जि. कोल्हापूर आरोपी क्रं.५ श्रीकांत मारुती कुंभार रा. वाकरे, ता.करवीर, जि. कोल्हापूर, आरोपी क्रं.६ अक्षय युवराज पांडव, रा. खुपीरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२५, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपी क्रं.७ आदित्य युवराज पांडव रा. खुपीरे, ता. करवीर, जि. कोल्हापूर हे खटला सुरु असताना मयत झाल्याने त्यांचे विरुध्दचा प्रस्तुतचा खटला अवसान पावला.

३. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

४. आरोपी क्रं.१ ते ६ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

५. जप्त सात चिव्याची काठया (वर्णन दोषारोपप्रमाणे) हया आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Viashali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.14 18:07:57 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक –१४.०५.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर